# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिकेत सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी
**{ सा.प्र.वि. }** विभागांतर्गत, स्थापन करण्यात आलेल्या वायु गुणवत्ता संचालन कक्षांतर्गत, राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रम व १५ वित्त आयोगाच्या अंतर्गत नागपूर महानगरपालिकेस वायु प्रदुषण नियंत्रण कृती आराखडा, सुक्ष्म नियंत्रण कृती आराखडा, वायु प्रदुषण नियंत्रणासंबंधीत प्रकल्प राबविणे, वेळोवेळी केंद्र व राज्य शासनाकडे माहिती सादर करणे उपयोगिता प्रमाणे पत्र सादर करणे, शासनाच्या ऑनलाईन पोर्टलवर वेळोवेळी सादर केलेली माहिती अद्यावत करणे व शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे वेळोवेळी माहिती शासनास सादर करणे. तसेच नागपूर शहराच्या वायु प्रदुषण नियंत्रण कृती आराखडयाची अंमलबजावणीकरीता विविध विभाग ज्यामध्ये RTO, MPCB, PWD, DCP, Traffic व मनपा अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग, उद्यान विभाग, परिवहन विभाग, वाहतुक विभाग, जनसंपर्क विभाग, विद्युत विभागाचा समावेश आहे. या विभागाशी समन्वय व त्यांच्याशी संबंधीत घटकाचे अंमलबजावणीकरीता मदत होईल. इत्यादी कामे करण्यासाठी जाहिरात क्र. ३१/पी.आर.दि. १०.०६.२०२४ च्या अनुषंगाने व गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीद्वारे प्रत्यक्ष मुलाखती घेवून निवड करण्यात आलेल्या श्री. रूपराव राऊत, सेवानिवृत्त उपअभियंता व श्री. चंद्रकांत गभणे, सेवानिवृत्त उपअभियंता यांना करार/कंत्राटी पद्धतीवर, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३(३) मधील तरतुदीनुसार, करार पद्धतीने प्रथमत: ६ महिन्याकरिता, शासन निर्णय दि. १७ डिसेंबर, २०१६ व शासन निर्णय ०८ सप्टेंबर, २०२३ मध्ये झालेल्या दुरूस्त तरतुदीनुसार मासिक परिश्रमिक तत्वावर कार्यालयीन आदेश क्र. ५३(A) ५३(B) ओ.ॲण्ड.एम, दि. १७.०३.२०२५ अन्वये "प्रकल्प अधिकारी (तांत्रिक सल्लागार)" "प्रकल्प सहयोगी" (तांत्रिक सल्लागार)" म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. त्यांची नियुक्ती दि. ०९.०७.२०२५ रोजी संपुष्टात आलेली असल्यामुळे व त्यांना करार पद्धतीवर पुढील ६ महिन्याकरीता मुदतवाढ दयावयाची असल्याने तांत्रिक खंड देवून दि. ११/०७/२०२५ पासुन दि. १०/०१/२०२६ पर्यंत मुदतवाढ दयावी लागेल. याप्रमाणे अंदाजे रू. ७,७५,२००/- इतका एकूण खर्च येणार असून, प्रस्तावास मंजुरी देण्यात यावी.

**टिप** :- सविस्तर टिपणी व कागदपत्रे नस्तीत उपलब्ध आहेत.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक** :- 284/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 16/09/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा.आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेत सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागांतर्गत, स्थापन करण्यात आलेल्या वायु गुणवत्ता संचालन कक्षांतर्गत, राष्ट्रीय शुद्ध हवा

कार्यक्रम व १५ वित्त आयोगाच्या अंतर्गत नागपूर महानगरपालिकेस वायु प्रदुषण नियंत्रण कृती आराखडा, सुक्ष्म नियंत्रण कृती आराखडा, वायु प्रदुषण नियंत्रणासंबंधीत प्रकल्प राबविणे, वेळोवेळी केंद्र व राज्य शासनाकडे माहिती सादर करणे उपयोगिता प्रमाणे पत्र सादर करणे, शासनाच्या ऑनलाईन पोर्टलवर वेळोवेळी सादर केलेली माहिती अद्यावत करणे व शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे वेळोवेळी माहिती शासनास सादर करणे. तसेच नागपूर शहराच्या वायु प्रदुषण नियंत्रण कृती आराखडयाची अंमलबजावणीकरीता विविध विभाग ज्यामध्ये RTO, MPCB, PWD, DCP, Traffic व मनपा अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग, उद्यान विभाग, परिवहन विभाग, वाहतुक विभाग, जनसंपर्क विभाग, विद्युत विभागाचा समावेश आहे. या विभागाशी समन्वय व त्यांच्याशी संबंधीत घटकाचे अंमलबजावणीकरीता मदत होईल. इत्यादी कामे करण्यासाठी जाहिरात क्र. ३१/पी.आर.दि. १०.०६.२०२४ च्या अनुषंगाने व गठीत करण्यात आलेल्या निवड समितीने थेट मुलाखतीद्वारे प्रत्यक्ष मुलाखती घेवून निवड करण्यात आलेल्या श्री. रूपराव राऊत, सेवानिवृत्त उपअभियंता व श्री. चंद्रकांत गभणे, सेवानिवृत्त उपअभियंता यांना करार/कंत्राटी पद्धतीवर, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३(३) मधील तरतुदीनुसार, करार पद्धतीने प्रथमत: ६ महिन्याकरिता, शासन निर्णय दि. १७ डिसेंबर, २०१६ व शासन निर्णय ०८ सप्टेंबर, २०२३ मध्ये झालेल्या दुरूस्त तरतुदीनुसार मासिक परिश्रमिक तत्वावर कार्यालयीन आदेश क्र. ५३(A) ५३(B) ओ.ॲण्ड.एम, दि. १७.०३.२०२५ अन्वये "प्रकल्प अधिकारी (तांत्रिक सल्लागार)" "प्रकल्प सहयोगी" (तांत्रिक सल्लागार)" म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. त्यांची नियुक्ती दि. ०९.०७.२०२५ रोजी संपुष्टात आलेली असल्यामुळे व त्यांना करार पद्धतीवर पुढील ६ महिन्याकरीता मुदतवाढ दयावयाची असल्याने तांत्रिक खंड देवून दि. ११/०७/२०२५ पासुन दि. १०/०१/२०२६ पर्यंत मुदतवाढ दयावी लागेल. याप्रमाणे अंदाजे रू. ७,७५,२००/- इतका एकूण खर्चाच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.